**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दिल्लीतल्या १२ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं उद्घाटन आणि लोकार्पण
- महाकुंभमेळ्यासाठी रेल्वे १३ हजार गाड्या सोडणार
- चीनमध्ये आढळलेल्या एच एम पी या विषाणूजन्य आजाराच्या प्रादुर्भावावर सरकारचं बारकाईनं लक्ष असल्याची केंद्रीय आरोग्य मंत्रालयाची ग्वाही
- बॉर्डर-गावस्कर कसोटी क्रिकेट मालिका ऑस्ट्रेलियानं ३-१ अशी जिंकली / भारताचा जसप्रीत बुमराह ठरला मालिकावीर

**आणि**

- टेनिसपटू सुमित नागल एएसबी टेनिस स्पर्धेच्या मुख्य फेरीत दाखल

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राजधानी दिल्लीत रेल्वे, मेट्रो आणि आरोग्याशी संबंधित १२ हजार २०० कोटी रुपयांच्या योजनांचं उद्घाटन आणि लोकार्पण होणार आहे. या कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्र्यांनी गाजियाबाद जिल्ह्यातल्या साहिबाबाद रेल्वे स्थानक ते दिल्लीतील न्यू अशोकनगर रेल्वेस्थानकादरम्यान नमो भारत रेल्वेनं प्रवासही केला. प्रवासादरम्यान

त्यांनी शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या चिमुकल्यांनी प्रधानमंत्र्यांना कविता म्हणून दाखवल्या तसंच स्वतः काढलेली चित्रं भेट दिली.

<><><><><>

उत्तर प्रदेशात प्रगायराज इथं होणार असलेल्या महाकुंभ मेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविक आणि यात्रेकरुंच्या सोयीसाठी भारतीय रेल्वे १३ हजार गाड्या चालवणार आहे. यात १० हजार नियमित आणि ३ हजार विशेष गाड्यांचा समावेश आहे. कुंभमेळ्या आधी आणि नंतर दोन ते ती अतिरिक्त दिवस असे मिळून ५० दिवस या गाड्या चालवल्या जातील अशी माहिती रेल्वे व्यवस्थापनानं दिली आहे. या मेळाव्याला मोठ्या संख्येनं भाविक आणि यात्रेकरू येण्याची शक्यता गृहीत धरून गर्दी टाळण्यासाठी लोकांची वर्दळ एकमार्गी ठेवण्याचं नियोजन केलं असल्याचंही रेल्वेनं कळवलं आहे.
प्रगायराज इथं येत्या १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत हा महाकुंभ मेळा होणार आहे.

<><><><><>

नागरिकांच्या वैयक्तिक माहितीचं संरक्षण करणं हा डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायद्याच्या मसुद्याचा उद्देश आहे. असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. नागरिकांच्या डिजिटल स्वरुपातल्या वैयक्तिक तपशीलांची गोपनीयता कायम राखण्यासाठी कायद्याची चौकट मजबूत करण्याच्या हेतूने ही नियमावली

तयार करण्यात आली आहे. सर्व घटकातल्या भागधारकांच्या गरजा आणि जगभरातल्या सर्वोत्तम पद्धतींचा अभ्यास करून हा मसुदा तयार करण्यात आला आहे. या मसुद्याला कायद्याचं स्वरूप देण्यापूर्वी नागरिकांनी या नियमावलीच्या मसुद्याविषयीचे आपले अभिप्राय आणि सूचना MyGov पोर्टलवर १८ फेब्रुवारीपर्यंत सादर कराव्यात, असं आवाहन मंत्रालयानं केलं आहे.

<><><><><>

भारत आणि फ्रान्स यांच्यातील वरुण या संयुक्त नौदल सरावात सहभागी होण्यासाठी फ्रेंच नौदलाची अणुऊर्जेवर चालणारी विमानवाहू नौका चार्ल्स डी गॉल काल गोव्यात दाखल झाली. गोव्याच्या मुरगाव पोर्ट ट्रस्ट जेट्टीवर काल या विमानवाहू नौकेचं आगमन झाल्यावर भारतीय नौदलाच्या वाद्यपथकानं औपचारिक स्वागत केलं. उभय देशांच्या नौदलांमधे कार्यक्षमता आणि परस्पर सामंजस्य वाढवणं हा या सरावाचा उद्देश आहे. हिंदी महासागर क्षेत्रात सागरी सुरक्षेसाठी योगदान देण्यासाठी फ्रान्स आणि भारत नियमितपणे परस्पर सहकार्य करत आहेत.

<><><><><>

अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिवन आजपासून दोन दिवस भारत दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि परराष्ट्र मंत्री डॉ.एस. जयशंकर यांची भेट घेऊन चर्चा करणार आहेत. अंतराळ, संरक्षण आदी क्षेत्रात उभयपक्षी संबंधावर त्यांची

चर्चा होणार असून हिंद प्रशांत महासागर क्षेत्रात  चीनच्या हालचालींविषयीचा मुद्दा त्यात असेल. सुलिवान आयआयटी दिल्ली मधे भारतीय उद्योजकांशी चर्चा करतील. सुलिवान यांचा हिंद- प्रशांत महासागर क्षेत्रातला हा अखेरचा औपचारिक दौरा आहे.

<><><><><>

एच एम पी या विषाणूजन्य आजाराचा प्रादुर्भाव चीनमध्ये गेल्या काही दिवसांपासून वेगानं वाढत असून केंद्र सरकारचं त्यावर बारकाईनं लक्ष असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. आय सी एम आर अर्थात भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद येत्या काही दिवसांत देशभरात  एच एम पी  च्या चाचण्या करणाऱ्या प्रयोगशाळांची संख्या वाढवणार असून वर्षभरात या आजाराचा एकंदर कल आणि प्रकार याचं निरीक्षण करणार असल्याचं मंत्रालयानं सांगितलं. यासंदर्भातल्या अलिकडच्या घडामोडींचा आढावा घेण्यासाठी  मंत्रालयानं नवी दिल्लीत संयुक्त बैठक घेतली. सध्या तरी भारतात चिंताजनक परिस्थिती नसल्याचं आरोग्य सेवा महासंचालक डॉ अतुल गोयल यांनी या बैठकीत  सांगितलं. या आजाराचा प्रादुर्भाव भारतासह जगभरात सुरु असला तरी भारतात श्वसनासंदर्भातल्या आजारांबाबत योग्य ते उपचार आणि जागरूकता आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

छत्तीसगढमधे सुरक्षा दलांनी राबवलेल्या शोधमोहिमेदरम्यान झालेल्या चकमकीत किमान ४ माओवादी ठार झाले. त्यांचे मृतदेह सुरक्षा दलांनी ताब्यात घेतले असून त्यांच्या जवळून मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्र आणि दारुगोळा जप्त केला आहे. या चकमकीत एक सुरक्षा जवान शहीद झाला.

**<><><><><>**

सक्तवसुली संचालनालयाच्या मुंबई विभागानं सुमारे ४ हजार ९५७ कोटी रुपयांच्या  कर्ज व्यवहार घोटाळ्याप्रकरणी मुंबई आणि दिल्ली इथल्या १४ ठिकाणांवर छापे घातले असून त्यामध्ये प्रतिभा इंडस्ट्रीज या कंपनीच्या कार्यालयाचा समावेश आहे. या कारवाईत 5 कोटी 4 लाख  रुपयांची  बँक खाती आणि म्युच्युअल फंड गोठवण्यात आले आहेत तसंच स्थावर मालमत्ता बळकावण्यासंदर्भातही  पुरावे सापडले आहेत. बँक ऑफ बडोदाने दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे केंद्रीय अन्वेषण ब्युरोनं दाखल केलेल्या प्राथमिक माहिती अहवालाच्या आधारे ही कारवाई केली जात आहे.

**<><><><><>**

केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय  आज फिट इंडिया मोहिमेंतर्गत गुजरातमधे पोरबंदर इथं आयोजित संडेज ऑन सायकल या उपक्रमात सहभागी झाले होते. त्यांनी पोरबंदर मधल्या उपलेटा परिसरात स्थानिकांसमवेत सायकलवरुन रपेट केली.

संडेज ऑन सायकल हा युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयानं सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया या संघटनेच्या सहयोगानं सुरु केलेला उपक्रम असून तो नागरिकांना तंदुरुस्ती तसंच जोम वाढवण्यासाठी प्रेरणा देण्याच्या उद्देशानं गेल्या महिन्यापासून सुरु करण्यात आलेला उपक्रम आहे.

**<><><><><>**

बॉर्डर-गावस्कर कसोटी क्रिकेट मालिका ऑस्ट्रेलियानं ३-१ अशी जिंकली आहे. सिडनी इथं झालेल्या पाचव्या सामन्यात आजच्या तिसऱ्या दिवशी भारतीय संघानं दिलेलं १६२ धावांचं लक्ष्य ऑस्ट्रेलिया संघानं ४ गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केलं.

आज तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात झाल्यानंतर भारतीय संघ केवळ १५७ धावांवर गारद झाला. भारतीय गोलंदाज जसप्रित बुमराहला मालिकावीर तर ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज स्कॉट बोलंड याला सामनावीर किताबानं गौरवण्यात आलं.

ऑस्ट्रेलियानं बॉर्डर-गावस्कर कसोटी मालिका तब्बल दहा वर्षांनी जिंकली आहे. तसच या मालिका विजयामुळं ऑस्ट्रेलिया संघानं कसोटी विश्व करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. त्यांचा सामना आता दक्षिण अफ्रिकेशी होणार आहे.

**<><><><><>**

भारतीय टेनिसपटू सुमित नागलने न्यूझीलंडमध्ये सुरू असलेल्या एएसबी क्लासिक टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या मुख्य सामन्यात प्रवेश केला आहे. त्याने आज सकाळी पात्रता फेरीच्या अंतिम सामन्यात फ्रान्सच्या एड्रियन मॅनारिनोचा पराभव केला. या स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत उद्या, भारताचा युकी भांब्री आणि त्याचा फ्रेंच साथीदार अल्बानो ऑलिवेट्टी या जोडीचा सामना नेदरलँडचा सँडर एरेंड्स आणि ब्रिटनचा ल्यूक जॉन्सन या जोडीशी होणार आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधे किश्तवाड जिल्ह्यात ग्वार मासू परिसरात एका वाहन अपघातात ४ जमांचा मृत्यू झाला तर दोन जण बेपत्ता झाले आहेत. घाटातल्या रस्त्यावरुन घसरुन हे वाहन खोल दरीतल्या नदीत कोसळलं. किश्तवाड पोलिसांनी मदतकार्य सुरु केलं आहे. किश्तवाडचे खासदार आणि केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

धुक्याच्या दाट थरामुळे आज सकाळी दिल्लीत विमान उड्डाण आणि रेल्वे सेवा विस्कळीत झाली आहे. धुक्यामुळे दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर अनेक विमानांना उशीर होत आहे. अनेक रेल्वेगाड्या उशिराने धावत आहेत.

**//<><><><><>//**